१४. वसुलीच्या कामात कांही अडचणी उद्‌भवल्यास त्याबाबत संबंधीत महानगरपालिका यांनी जिल्हाधिकारी यांचेकडून मार्गदर्शन घ्यावे तसेच याबाबत जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी संबंधित महानगरपालिका यांना आवश्यक ती मदत करावी.

१५. शासनाने याप्रकरणी वेळोवेळी दिलेल्या आदेशाबाबत जिल्हाधिकारी यांनी संबंधित महानगरपालिकांना सूचना द्याव्यात.

१६. हा आदेश ज्या दिनांकापासून लागू होणार आहे त्या दिनांकापूर्वीच्या थकीत वसुलीच्या रकमा हया संबंधीत जिल्हाधिकारी यांनीच वसूल कराव्यात.

१७. या प्रयोजनासाठीच्या वसुलीच्या रकमाबाबत संबंधीत महानगरपालिका यांचेकडून प्राप्त विहीत आकडेवारी जिल्हाधिकारी यांनी शासनाकडील "टि-२" कार्यासनाकडे (महसूल व वन विभाग) वेळोवेळी पाठवावी. याबाबत "टि-२" कार्यासनाने जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करुन मागणीच्या रकमांच्या वाटपाबाबतची कार्यवाही कायद्यातील तरतुदीनुसार करावी.

१८. अकृषिक आकारणीच्या वसुली व्यतिरिक्त इतर सर्व बाबी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांनीच करावयाच्या आहेत.

१९. हे आदेश दिनांक १ एप्रिल, २००९ पासून अंमलात येतील.

२०. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेला असून, त्याचा संकेतांक २००९०२०६१२०९४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स्वाक्षरित/-
(रमाकांत अस्मर)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रती,

१) सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ०५ प्रतीत),
२) सर्व जिल्हाधिकारी (जिल्हा मुंबई शहर वगळून) (प्रत्येकी १० प्रतीत)
३) सर्व महानगरपालिका (प्रत्येकी १० प्रती)
४) महालेखापाल-१, मुंबई, महाराष्ट्र राज्य, (५ प्रती)
५) महालेखापाल-२, नागपूर, महाराष्ट्र राज्य,(५ प्रती)
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,(२ प्रती)
७) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,(२ प्रती)
८) वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई-४०००३२,(२ प्रती)
९) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,(२ प्रती)
१०) महसूल व वन विभाग, कार्यासन टी-२/ब-१/ब-२/म-८, मंत्रालय, मुंबई-४०००३२,(प्रत्येकी २ प्रती)
११) पीएसी कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२,(२ प्रती)
१२) वेब को-ऑडीनेटर, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, (१ प्रत)
१३) निवड नस्ती, ल-५ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत, माहितीस्तव सविनय सादर,

मा.मुख्यमंत्री यांचे उप सचिव, मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई-४०० ०३२,
मा.उप मुख्यमंत्री यांचे उप सचिव, उप मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई-४०० ०३२,
सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.

४. मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या उक्त निर्णयाच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ३३०-अ अन्वये त्यांना असलेले अधिकार त्यांचे कार्यक्षेत्रात महानगरपालिका आयुक्त यांना राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्रदान करण्याची कार्यवाही करावी.

५. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील प्रकरण ४ व ७ हे मुंबई शहर जिल्ह्यास लागू नसल्याने, हा शासन निर्णय मुंबई शहर जिल्ह्यास लागू असणार नाही.

६. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४७ क नुसार वसूल करावयाच्या रुपांतरण कराची रक्कम, अकृषिक परवानगी देताना एकदाच वसूल केली जाते व ती रक्कम जिल्हाधिकारी यांनी वसूल करावयाची असल्याने ती महानगरपालिकेने वसूल करण्याची आवश्यकता नाही.

७. जिल्हाधिकारी यांनी अकृषिक परवानगी दिल्यानंतर त्याची एक प्रत महानगरपालिकेस देण्यात यावी. प्रत्येक आर्थिक वर्षात दर ३ (तीन) महिन्यांनी अकृषिक कराची सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ मध्ये दिलेल्या विहीत नमुन्यात माहिती भरुन, जिल्हाधिकारी संबंधीत महानगरपालिकेस १५ दिवसांत पोहोच करतील. तसेच वर्षाच्या अखेरीस अकृषिक कराची एकत्रित एकूण मागणी महानगरपालिकेस कळवतील.

८. महानगरपालिका, जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त माहितीच्या आधारे संबंधित मालमत्ताधारकांना, मालमत्ता कराच्या मागणीच्या नोटीसांबरोबरच अकृषिक कराच्या मागणी रकमेची नोटीस बजावतील व मालमत्ताकराबरोबरच अकृषिक कराचीही वसुली करुन व आवश्यक त्या रकमा कोषागारात भरणा करुन, प्रपत्र-२ मध्ये माहिती जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करतील.

९. महानगरपालिकेकडून त्या त्या आर्थिक वर्षात वसूल न झालेल्या अकृषिक आकारणीच्या बाबतीत थकबाकीदारांची माहिती जिल्हाधिकारी प्रपत्र-३ मध्ये भरुन प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस १५ दिवसांच्या आत आयुक्त, महानगरपालिका यांना पोहोच करतील. तर आयुक्त महानगरपालिका अशी थकबाकी वसूल झाल्याबाबतची माहिती प्रपत्र-४ मध्ये जिल्हाधिकारी यांना कळवतील.

१०. महानगरपालिका अकृषिक कराच्या मागणीच्या रकमा वसूल झाल्यानंतर शासन कोषागारात "महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम ८" मधील तरतुदीनुसार विहित केलेल्या मुदतीमध्ये भरणा करतील व भरणा केलेल्या रकमेच्या चलनाची एक प्रत त्याचवेळी जिल्हाधिकारी यांना सादर करतील.

११. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्रमांक-ईडीसी-१०९७/प्र.क्र.२०५/ल-५, दिनांक ३/४/१९९८ अन्वये महानगरपालिकांचे आयुक्त यांनी शासकीय कराच्या मागणीच्या रकमा नियमानुसार विहित कालमर्यादेत शासकीय कोषागारात भरणा होत आहेत व त्या महानगरपालिकेकडे प्रलंबित रहात नाहीत याची जबाबदारी संबंधित महानगरपालिकांचे मुख्य लेखापाल यांचेवर सोपवावी व सदर माहिती त्या-त्या वेळी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात येईल, याची दक्षता घ्यावी, कर वसूल करुनही शासनाकडे भरणा न केल्यास संबंधित मुख्य लेखापाल हे कारवाईस पात्र राहतील याचीही समज देणेत यावी.

१२. या रकमेच्या वसुलीबाबत महानगरपालिका यांना एकूण रकमेच्या ५% इतका वटावा देय असून, तो त्यांनी वसुली झाल्यानंतर परस्पर कापून घ्यावा.

१३. या वसुलीच्या कामासाठी महानगरपालिका यांना आस्थापनेवरील अथवा अन्य कोणताही खर्च नव्याने अनुज्ञेय असणार नाही.

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६**
मधील अकृषिक आकारणीच्या व वसुलीच्या
प्रचलित पध्दतीत सुधारणा करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन,**
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.एनएपी-१००६/प्र.क्र.२७०/ल-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक - ५ फेब्रुवारी, २००९

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ७२ अन्वये जमीन महसूल हा जमिनीवरील सर्वश्रेष्ठ भार आहे. तर कलम ६४ अन्वये सर्व जमीनी, जमीन महसूल देण्यास पात्र आहेत. तसेच कलम १०९ अन्वये अकृषिक जमीनीवर शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या प्रमाणदराने, अकृषिक आकारणी देय आहे. कलम १२३ (ख) अन्वये नागरीतर क्षेत्रातील गावांच्या / नगरांच्या किंवा शहरांच्या भागात असलेल्या मूळ गावठाणातील निवासी वापराच्या इमारतीखालील जमिनीस महसूल आकारणी लागू नाही. तथापि, मूळ गावठाणातील या उक्त जमिनींचा वापर जर वाणिज्यीक / औद्योगिक प्रयोजनासाठी केला गेल्यास किंवा करावयाचा असल्यास, त्यास मात्र प्रचलित दरानुसार अकृषिक आकारणी लागू केली जाते. त्याप्रमाणे महसूल अधिका-यांकडून, उक्त जमीनीवर दरवर्षी प्रचलित दरानुसार अकृषिक आकारणी करुन त्याची वसुलीही करण्यात येते.

२. महानगरपालिका क्षेत्रात, महापालिका त्यांचेशी संबंधित वेगवेगळया कायद्यानुसार मालमत्ता धारकांकडून मालमत्ता कर व इतर अनुषंगिक कराची वसूली करत असतात. नागरी भागात कराची वसुली एकत्रित व सहजरित्या एकाच यंत्रणेकडून करता यावी या दृष्टीकोनातून, महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका मालमत्ताधारकाकडून वेळोवेळी आकारत असलेल्या करांच्या वसूलीबरोबरच अकृषिक कराचीही वसूली करणेची कार्यवाही महानगरपालिका यांनी करावी असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. उक्त परिस्थितीच्या अनुषंगाने, राज्य मंत्रीमंडळाने दिनांक १५/१०/२००८ च्या बैठकीत याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

(१) फक्त अकृषिक आकारणी वसुलीचे जिल्हाधिका-यांचे अधिकार महानगरपालिका क्षेत्रात आयुक्त, महानगरपालिका यांना देण्यात यावेत.

(२) महानगरपालिका क्षेत्रातील अकृषिक कराच्या मागणीची रक्कम महानगरपालिकेकडून मिळकत कराच्या समवेत वसूल करण्यात यावी. महानगरपालिका क्षेत्रातील एकूण अकृषिक कराच्या मागणीच्या ७५ % इतकी रक्कम महानगरपालिकेस नगरविकास विभागाकडून देय असलेल्या अनुदानातून शासन स्तरावरुन वळती करुन देण्यात यावी. उर्वरित २५% रकमेपैकी २०% रक्कम महानगरपालिकेने कोषागारात जमा करावी. एकूण अकृषिक आकारणीच्या मागणीपैकी ५% इतकी रक्कम वटावा (Collection Charges) म्हणून संबंधित महानगरपालिका यांचेकडे ठेवून घेण्यास मान्यता देण्यात आली. ही कार्यपध्दती केवळ अकृषिक आकारणी पुरतीच लागू असून रुपांतरण कराची रक्कम मात्र संपूर्णतः शासकीय कोषागारात जमा करणे बंधनकारक राहील.